# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.३७** **(महासभा)**

---

**विषय क्र.:- ०१** **प्रशासक ठराव क्र.:- २७१** **दिनांक :-३०/०४/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. दि.०८/०४/२०२५ मंगळवार रोजी सकाळी- ११.३० वाजता संपन्न झालेल्या सभा क्र.३६ चे कार्यवृत्त कायम करणे.

**विषय :-** दि.०८/०४/२०२५ मंगळवार रोजी सकाळी- ११.३० वाजता संपन्न झालेल्या सभा क्र.३६ चे कार्यवृत्त कायम करणे.

---

वाचा क्र.१ व २ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

दि.०८/०४/२०२५ मंगळवार रोजी सकाळी- ११.३० वाजता संपन्न झालेल्या सभा क्र.३६ चे कार्यवृत्त कायम करणेस मंजूरी देण्यात येत आहे.

**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260

**सभा क्र.३७** **(महासभा)**

**विषय क्र.:- ०२** **प्रशासक ठराव क्र.:- २७२** **दिनांक :-३०/०४/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. समन्वय अधिकारी, प्रभाग समिती क्रं.०१ व ०४ यांचेकडिल जा.क्र./प्र.स.क्र.१ ते ४ /२५२/२०२५-२६ दि.२८/०४/२०२५
३. सहाय्यक आयुक्त, प्र.स.क्र.१ व ३ यांचा दि.१६/०४/२०२५ चा अभिप्राय
४. सहाय्यक आयुक्त, प्र.स.क्र.२ व ४ यांचा दि.१७/०४/२०२५ चा अभिप्राय
५. उपायुक्त (महसुल) यांचा दि.२१/०४/२०२५ चा अभिप्राय
६. मुख्य लेखापरिक्षक यांचा दि.२३/०४/२०२५ चा अभिप्राय
७. आयुक्त यांचा दि.२५/०४/२०२५ चा अभिप्राय

**विषय :-** जास्तीत जास्त मिळकत धारकांनी १०% सुटचा लाभ घ्यावा याकरीता सन २०२५-२०२६ पासुन पुढे दरवर्षी एप्रिल व मे मध्ये संपुर्ण वर्षाचा आगाऊ भरणा (शासकीय कर वगळुन) करणाऱ्या मिळकत धारकांना १०% सुट (रिबेट) देणे बाबत.

---

वाचा क्र.१ व समन्वय अधिकारी, प्रभाग समिती क्रं.०१ व ०४ यांचा वाचा क्रं. २ ते ७ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव मालमत्ता कर विभागाकडील सन २०२५-२०२६ मालमत्ता कराचा भरणा सुरु झालेला आहे. माहे एप्रिल महिन्यात मालमत्ता कराचा भरणा करणाऱ्यां मिळकत धारकांची संख्या पाहता, तसेच मालमत्ता कराची जास्तीत जास्त वसुली होण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे आवश्यक आहे.

“महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १४० अ मधील तरतुदीनुसार मालमत्ता कर देण्याकरीता मुख्यत: पात्र असणारी कोणतीही व्यक्ती असा कर त्या प्रयोजना करीता बिलांत विनिर्दीष्ट केलेल्या दिनांकापुर्वी भरत असेल किंवा असा कर संपुर्ण वर्षाकरीता आगाऊ भरत असेल तर तिला महानगरपालिका सर्वसाधारण आदेशाव्दारे निर्धारीत करील अश्या दराने मालमत्ताकर भरण्यातुन सुट देण्यात येईल आणि मालमत्तेच्या वापरकर्त्यांच्या वेगवेगळया वर्गाकरीता अशी सुट देण्याचे वेगवेगळे दर विनिर्दिष्ट करता येतील असे नमुद आहे.”

तसेच यापुर्वी स्थायी समिती ठराव क्रं.४३४ दि.२८/०४/२०१६ अन्वये आयुक्त यांचे खालील नमुद बाबींच्या प्रस्तावास मान्यता प्रदान केलेली असुन त्याबाबींना महासभा ठराव क्रं.८१० दि.३०/०५/२०२२ अन्वये मान्यता प्रदान केलेली आहे. त्या मंजुर बाबी खालील प्रमाणे.

१. मालमत्ता कराचा संपुर्ण भरणा वर्षाकरीता दि. ३० एप्रिल पर्यंत पुर्ण भरणा केल्यास १०% रिबेट
२. ३१ जुलै पर्यंत मालमत्ता कराचा भरणा करणाऱ्या मिळकत धारकांना ७% रिबेट
३. १ ऑगस्ट ते ३१ ऑक्टोंबर पर्यंत मालमत्ता कराचा भरणा करणाऱ्या मिळकत धारकांना ५% रिबेट
४. १ नोव्हेंबर ते ३१ डिसेंबर पर्यंत मालमत्ता कराचा भरणा करणाऱ्या मिळकत धारकांना ३% रिबेट देण्याबाबत नमुद करण्यात आलेले आहे.

उक्त नमुद ठरावानुसार ३० एप्रिल पर्यंत १०% सुट सुरु आहे. यापुर्वी सन-२०२१-२०२२, २०२२-२०२३ व २०२३-२०२४ मध्ये मे महिन्यात सुध्दा १०% सुटचा लाभ आगाऊ कराचा भरणा करणाऱ्या मिळकत धारकांना महासभेच्या

वेगवेगळया ठरावाच्या अनुशंगाने मान्यता देण्यात आलेली होती. उक्त नमुद ३ वर्षात मे महिन्यात झालेली वसुली खालील प्रमाणे आहे.

मागील तीन वर्षाचा महिनानिहाय तुलनात्मक तक्ता

| | | सन-२०२१-२०२२ | | सन-२०२२-२०२३ | | सन-२०२३-२०२४ | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | महिना | कर भरणाऱ्या मिळकत धारकांची संख्या | वसुल रक्कम | कर भरणाऱ्या मिळकत धारकांची संख्या | वसुल रक्कम | कर भरणाऱ्या मिळकत धारकांची संख्या | वसुल रक्कम |
| १ | एप्रिल | ५२६० | ३५५५१७०० | १३४९४ | ११७९३१५३१ | ६६९६ | ५०७२६४७० |
| २ | मे | ८११६ | ५२३१९५४४ | ८८३९ | ८१४२८७९८ | १२५७९ | १२०३१५०६२ |
| एकुण रक्कम रु. | | १३३७६ | ८७८७१२४४ | २२३३३ | १९९३६०३२९ | १९२७५ | १७१०४१५३२ |

ऑनलाईन कर भरणाऱ्या मिळकत धारकांचा तपशिलवार तक्ता

| | | सन-२०२१-२०२२ | | सन-२०२२-२०२३ | | सन-२०२३-२०२४ | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | महिना | कर भरणाऱ्या मिळकत धारकांची संख्या | वसुल रक्कम | कर भरणाऱ्या मिळकत धारकांची संख्या | वसुल रक्कम | कर भरणाऱ्या मिळकत धारकांची संख्या | वसुल रक्कम |
| १ | एप्रिल | ५१४५ | ३४३०४०९८ | ३७२० | ३५७६७०४७ | १३९९ | १२७४१५४९ |
| २ | मे | ५७०६ | ३२४४६६०१ | १६१० | १७३६७६८२ | ३३४० | ३३७०६४४० |
| एकुण रक्कम रु. | | १०८५१ | ६६७५०६९९ | ५३३० | ५३१३४७२९ | ४७३९ | ४६४४७९८९ |

उक्त नमुद तक्त्यातील भरणा करण्यात आलेल्या मिळकत धारकांची संख्या पाहता जास्तीत जास्त मिळकत धारकांनी १०% सुटचा लाभ घ्यावा याकरीता सन-२०२५-२०२६ पासुन पुढे दरवर्षी एप्रिल व मे मध्ये संपुर्ण वर्षाचा आगाऊ भरणा (शासकीय कर वगळुन) करणाऱ्या मिळकत धारकांना १०% सुट (रिबेट) देण्यास मान्यता मिळण्यासाठी समन्वय अधिकारी, प्रभाग समिती क्रं.०१ व ०४ यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ७ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप येणार नाही याची दक्षता घ्यावी.

**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१
फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**
Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260

**सभा क्र.३७** **(महासभा)**

**विषय क्र.:- ०३** **प्रशासक ठराव क्र.:- २७३** **दिनांक :-३०/०४/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. समन्वय अधिकारी, प्रभाग समिती क्रं.०१ व ०४ यांचेकडिल जा.क्र./प्र.स.क्र.१ ते ४ /२८४/२०२५-२६ दि.२९/०४/२०२५
३. सहाय्यक आयुक्त, प्र.स.क्र.१ व ३ यांचा अभिप्राय
४. सहाय्यक आयुक्त, प्र.स.क्र.२ व ४ यांचा अभिप्राय
५. उपायुक्त (महयुल) यांचा दि.२४/०४/२०२५ चा अभिप्राय
६. मुख्य लेखापरिक्षक यांचा दि.२८/०४/२०२५ चा अभिप्राय
७. आयुक्त यांचा दि.२८/०४/२०२५ चा अभिप्राय

**विषय :-** जळगांव शहर महानगरपालिका हद्दीतील संपुर्ण मिळकतीचे स्थळ सर्वेक्षण पुनर्मुल्यांकन, मुल्यनिर्धारण संगणकीकरण करणेकरीता अभिकर्ता नियुक्त करणे बाबत.

---

वाचा क्र.१ व समन्वय अधिकारी, प्रभाग समिती क्रं.०१ व ०४ यांचा वाचा क्रं. २ ते ७ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग मंत्रालय मुंबई यांचे पत्र क्रं. एफएफसी-२०२४/प्र.क्र./नवि-४ दिनांक २५ जुलै २०२४ चे पत्र प्राप्त झाले असुन १५ व्या वित्त आयोगांतर्गत केंद्र शासनाकडुन राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था व कटक मंडळे यांना सन २०२०-२१ ते २०२५-२६ या कालावधीत निधी प्राप्त होणार आहे. त्याबाबत केंद्र शासनाने निश्चित कार्यपध्दती ठरवुन दिली आहे. सन २०२४-२५ व तद्नंतर १५ व्या वित्त आयोगांअतर्गत अनुदानास प्राप्त होण्यासाठी अ) राज्याच्या GSDP च्या प्रमाणात मालमत्ता कराचे उत्पन्न वाढविणे आवश्यक आहे.

आ) मालमत्ता कराच्या उत्पन्नात सन २०२२-२३ पेक्षा सन २०२३-२४ मध्ये वाढ असणे आवश्यक असुन ती राज्याच्या मागील ५ वर्षाच्या सरासरी GSDP मधील वाढीच्या (९.४४%) अथवा त्याहुन अधिक असावी अन्यथा १५ व्या वित्त आयोगांतर्गत अनुदान प्राप्त होणार नाही असे नमुद करण्यात आले आहे.

जळगांव शहर महानगरपालिका हद्दीतील मिळकतींचे मालमत्ता कराचे फेर मुल्यांकन हे सन २००२-०३ मध्ये तत्कालीन नगरपालिका असतांना करण्यात आलेले होते. तद्नंतर सन २०२१-२२ मध्ये जळगांव शहर महानगरपालिका हद्दीतील मिळकतींचे मालमत्ता कराचे फेर मुल्यांकन बाह्य अभिकर्त्यांव्दारे (स्थापत्य कन्सलटंट, अमरावती ) पुर्ण करण्यात आलेले आहे.

जळगांव शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती क्रं. ०१ ते ०४ अंतर्गत असलेल्या मिळकतींची मालमत्ता कर व पाणीपट्टीची सन २०२४-२५ ची एकुण मागणी रु.२२७ कोटी ही आहे. पैकी सन २०२४-२५ अखेर वसुली जवळपास रु. ९७.५० कोटी आहे. म्हणजे जवळपास एकुण मागणीच्या ४६% वसुली झालेली आहे. महानगरपालिकेचे मुख्य आर्थिक स्त्रोत मालमत्ता कर, पाणीपट्टी कराच्या इत्यादी वसुलीनेच होत असते, सद्य परिस्थीती प्रभाग समिती क्रं. ०१ ते ०४ मध्ये एकुण ३७ कार्यासन मालमत्ता कर वसुलीचे व प्रत्येकी एक असे ०४ कार्यासन बारनिशीचे असे एकुण ४१ कार्यासन आहेत. परंतु सद्दपरिस्थितीत सदर ४१ कार्यासनांवर फक्त जवळपास २४ लिपीक कार्यरत आहे. तसेच या २४ लिपीकांपैकी लगतच्या कालावधीत ३ ते ४ लिपीक विहीत वयोमानानुसार सेवानिवृत्त होणार आहे.

जळगांव शहर महानगरपालिका हद्दीतील मालमत्तांची कर आकारणी वार्षिक भाडे कर मुल्य पध्दतीने सन २०२१-२२ मध्ये करण्यात आलेले आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुचि (ड) प्रकरण ८ कराधान नियम २१ (२) मधील तरतुदी नुसार दर ५ वर्षातुन निदान एकदा तरी नविन कर आकारणी पुस्तक तयार करण्यात आले पाहीजे अशी तरतुद आहे. त्या अनुषंगाने सन २०२६-२७ ते २०३० -३१ या पंचवार्षिक कालावधी करीता कर आकारणी करणे आवश्यक आहे.

जळगांव शहर महानगरपालिकेत मालमत्ता कर सर्वेक्षण व करमुल्यांकन निर्धारणाच्या कामाबाबत सविस्तर आढावा घेऊन व सदर सर्वेक्षणा नंतर मोठया प्रमाणात मालमत्तांमध्ये झालेली वाढ व बदल तसेच मालमत्ता कर आकारणी न झालेल्या मालमत्ता शोधणे व यापुर्वीच्या सर्वेक्षण व आकारणी मधील वापरात बदल झालेल्या मालमत्तांची पुनर्मुल्यांकन निर्धारणाची प्रक्रीया राबविणे करीता खालील बाबी प्रस्तावित करण्यात येत आहे.

१. जळगांव शहर महानगरपालिका क्षेत्रातील यापुर्वी नोंदणीकृत असलेल्या संपुर्ण मालमत्ता (इमारती व जमिनी / खुल्याभुखंडासह ) यांचे प्रत्यक्ष स्थळावर जाऊन GIS आधारीत Geo Sequencing करुन नविन अद्यावत संगणकीय युनिक प्रॉपर्टी आयडेंटिफीकेशन कोड विकसीत करुन यापुर्वीचा मालमत्ता क्रमांक व नविन मालमत्ता क्रमांकाची जुळवणुक करुन प्रत्यक्ष स्थळावरील मालमत्ता धारकांच्या तथा भाडयाने उपयोगात असल्यास भोगवटा धारकांचे नावानुसार अद्यायावत नोंदवही तयार करणे GIS आधारीत नोंदणी अभियाना करीता अद्यायावत ड्रोन छायाचित्र घेणे व प्रत्यक्ष स्थळावर मालमत्तांना भेट देऊन सद्या कर विभागात असलेल्या मालमत्ता नोंदवहीची पडताळणी करुन अद्याप कर मुल्य निर्धारण न झालेल्या मालमत्ता शोधणे व नोंदणी करणे.

२. यापुर्वी जळगांव शहर महानगरपालिका हद्दीतील मालमत्तांचे झालेले सर्वेक्षणाच्या अहवालातील प्रत्येक मालमत्तेस प्रत्यक्ष स्थळावर जाऊन पडताळणी करणे. ज्या मालमत्तांना प्राथमिक सर्वेक्षणात कमी आकारणी झालेली आहे अथवा कर आकारणीच झालेली नाही, अथवा वापरात बदल व बांधकामात वाढ तथा इतर कोणत्याही कर मुल्यांकनाकरीता आवश्यक असलेल्या निकषात बदल झाला असल्यास अशा मालमत्तांना शोधुन स्वतंत्र नोंदवही तयार करणे व ज्या मालमत्तांची यापुर्वी नोंद झालेली आहे व महानगरपालिकेतील नोंदी व प्रत्यक्ष स्तरावरील नोंदीचे प्राथमिक सर्वेक्षणा नुसार तपासणी नंतर व किमान बदल आढळुन येतील अशा मालमत्तांची स्वतंत्र नोंद घेणे. सदर सर्वेक्षणात संपुर्ण मालमत्तांचे नव्याने GIS मॅपींग करुन डिजीटल फोटोग्राफ काढणे व महानगरपालिका विहीत करेल अश्या नमुन्यामध्ये माहिती व सर्वेक्षण पुर्ण करणे.

३. उपरोक्त कामानंतर प्रत्यक्ष स्थळावर केलेल्या सर्वेक्षणानुसार ज्या मालमत्तांमध्ये वाढ अथवा वापरांत बदल अथवा यापुर्वी कर आकारणी झालेली नसेल किंवा आवश्यकतेपेक्षा कमी करमुल्य निर्धारण करण्यात आले असेल अशा मालमत्तांचे स्वतंत्र सर्वेक्षण करुन प्रत्यक्ष स्थळावर मालमत्तांची वापर निहाय मोजणी करुन नकाशा तयार करणे संपुर्ण मोजमाप करणे व महानगरपालिकेद्वारा निर्धारित मालमत्ता विवरण तक्त्यामध्ये संपूर्ण माहितीचे संकलन करुन संगणकीय मालमत्ता विवरण तक्ता तयार करणे.

४. नव्याने नोंद झालेल्या तथा वरिल प्रमाणे फेरबदल करुन करमुल्य निर्धारणाच्या फेर आकारणी करण्याकरीता आवश्यक मालमत्तांची मोजणी करुन संपूर्ण माहिती व नकाशाच्या संगणकीकरण करणे तसेच महानगरपालिकेद्वारा निर्धारित केलेल्या दराने व मालमत्ता कराच्या टक्केवारीनुसार संगणकीय मालमत्ता करुन करमुल्य निर्धारण करुन प्राथमिक करमुल्य निर्धारण तथा वैयक्तीक सुचना नोटीस व सुनावणी करीता आवश्यक मनुष्यबळ तथा साहित्य पुरवठा व संगणकीय नियोजन करून सुनवणी नंतरचे फेरबदल नोंदणीकृत करुन अंतिम करमुल्य निर्धारण यादी तयार करणे.

५. यापुर्वी निर्धारण झालेल्या व कोणतेही बदल न झालेल्या मालमत्तांची महानगरपालिकेस आवश्यकता असल्यास सुधारीत करुन करमुल्य निर्धारणाचे दर व टक्केवारी अनुसार आवश्यकतेनुसार करमुल्यांकनांत सुधारणा करणे बाबत निविदा प्रक्रियेत प्रावधान करणे आवश्यक आहे.

६. निबंधक कार्यालय (आय जी आर) कार्यालयाच्या आज्ञावलीशी महानगरपालिकेच्या मालमत्ताकराच्या आज्ञावलीचे एकत्रीकरण (इंट्रीग्रेशन) करणे. तसेच महाराष्ट्र विद्युत कंपनीच्या आज्ञावलीशी महानगरपालिकेच्या मालमत्ताकराच्या आज्ञावलीचे एकत्रीकरण (इंट्रीग्रेशन) करणे. मालमत्ताकर व पाणीपट्टीच्या आज्ञावलीचे महानगरपालिकेच्या इतर विभागांच्या आज्ञावलीशी एकत्रीकरण (इंट्रीग्रेशन) करणे. रोडमॅपींग करुन जी आय एस बेस मागणी नोंदवही तयार करणे. स्वकर आकारणी (सेल्फ असेसमेंट) ऑनलाईन व ऑफलाईन दोनही पध्दतीने करणे. या कामांचा सुध्दा समावेश करणे आवश्यक आहे.

७. शहराच्या हद्दितील महानगरपालिकेच्या मालकीच्या सर्व मिळकती (इमारती व जमीनी / खुला भुखंडसह) चे मोजमाप करुन नंबरीग करुन त्याबाबत आद्ययावत संपुर्ण माहिती करणे आवश्यक आहे.

८. वरीलप्रमाणे सर्वेक्षणांत प्राप्त झालेल्या आद्यायावत माहिती नुसार मनपा द्वारा निर्देशीत केल्या गेल्यास संपुर्ण जुन्या व नवीन तथा सुधारीत मालमत्तांचे "भांडवली मुल्यनिर्धारण" पध्दतीने करमुल्यांकन करण्याकरीता आवश्यक बाबी सर्वेक्षणात नमुद मालमत्तांच्या बांधकाम तथा जमिनीचे दर निश्चित करुन मनपाद्वारा निश्चित केलेल्या भारांका अनुसार करमुल्य निर्धारणाची प्रक्रिया राबविणे.

९. मालमत्ताकर विभागातील दैनंदिन कामे तथा करमुल्य निर्धारण व नव्याने होणाऱ्या मालमत्तांची मोजणी करुन वेळोवेळी मालमत्ता धारकांचे प्राप्त अर्जावर संगणकीय कार्यवाही करुन समायोजन करणे तथा वार्षिक मालमत्ताकराची मागणी देयके व वसुली तथा नोंदवही तयार करणे व इतर अनुषंगीक कामांकरीता मनुष्यबळ तथा सेवा पुरविणे, वार्षिक देखभाल दुरुस्ती व साहित्य पुरवठा व त्याबाबत आवश्यक असलेले संगणक आज्ञावली विकसीत करुन अद्यावत पध्दतीने ऑनलाईन संगणकीय व्यवस्थापनाकरीता आज्ञावली पुरविणे.

१०. यासोबतच अत्यंत अद्ययावत डाटा ॲनालिसीस प्रणाली राबवून मालमत्ताकर आकारणी व वसुली याबाबत विविध मार्गदर्शक माहिती वेळोवेळी उपलब्ध होण्याकरीता संगणक आज्ञावली व सेवा पुरवठाधारक याची नियुक्ती करणे देखील आवश्यक आहे.

वरीलप्रमाणे यापुर्वी महानगरपालिकेने वेळोवेळी राबविले तथा एजन्सी द्वारे सर्वेक्षण पुर्ण करण्यात आलेल्या मालमत्तांचे सर्वेक्षणाच्या डाटयाचा देखील नव्याने होणाऱ्या सर्वेक्षणात वापर करुन उपयोगांत आणता येईल व संपुर्ण मालमत्तांचे फेर सर्वेक्षण करुन नव्याने जीआयएस आधारीत Geo Sequencing तथा मालमत्तांची पुन:पडताळणी प्रक्रिया करुन ज्या मालमत्तांमध्ये कुठलाही फेरबदल नाही व आकारणी समाधानकारकरीत्या करण्यात आलेली आहे अशा मालमत्तांची महानगरपालिकेतर्फे याआधी व यानंतर देखील मालमत्ता कर आकारणी बाबत वेळोवेळी देण्यात येणाऱ्या सुविधा आधारित सुट बाबत देखील माहिती संकलित करुन मालमत्ता धारकांची अद्ययावत नावे तथा वापर तथा मोबाईल क्रमांक व ईमेल आयडी याबाबत देखील महानगरपालिकेची संपूर्ण माहिती अद्ययावत होऊ शकेल व सर्वेक्षणाबाबत प्रति मालमत्ता सर्वसमावेशक दरानुसार निविदा बोलविल्यास महानगरपालिकेचे निधीची बचत होऊ शकेल.

तसेच वरील सर्वेक्षण अभियान पूर्ण झाल्यानंतर ज्या मालमत्तांना यापूर्वी कर आकारणी झालेली नाही अथवा नवीन बांधकामे, वाढीव बांधकामे व यापूर्वी चुकीची आकारणी झालेली मालमत्ता देखील शोधण्यात मदत होईल व केवळ याच मालमत्तांची नव्याने मोजणी व संगणकीय माहिती तथा नकाशे तयार करुन करमुल्य निर्धारणाची प्रक्रिया राबविणे योग्य असेल. तसेच ज्या मालमत्तांना यापूर्वी चुकीची अथवा नव्याने प्रथमत: कर आकारणी करण्यात आली असेल अशा मालमत्तांची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम १५० (अ) अन्वये सुधारीत करमुल्य निर्धारण पुर्वलक्षी प्रभावाने करुन महानगरपालिकेचे संभाव्य नुकसान टाळून मालमत्ता कराचे उत्पन्न वाढविता येईल. यामुळे महानगरपालिकेचे संबंधीत मालमत्ता सर्वेक्षणामुळे मोठया प्रमाणांत वाढ होऊन केवळ नव्याने करमुल्य निर्धारण होणे व सुधारीत करमुल्य निर्धारण होणाऱ्या मालमत्तांच्या मालमत्ताकर व विविध कराच्या एकुण रक्कमेवर वाढीव रक्कमेच्या टक्केवारीने निविदा प्रक्रिया राबविल्यास रेव्हेन्यु जनरेशन व शेअरिंग मॉडेलनुसार योग्य ठरेल.

उपरोक्त कर आकारणी बाबतच्या संपुर्ण कार्यवाहीसह, अत्याधुनिक पध्दती व तांत्रिक कौशल्य तसेच महाराष्ट्र राज्य तसेच देशातील इतर कर आकारणी झालेल्या नगरपरिषद/ महानगरपालिकांनी यशस्वीरित्या राबविलेल्या पध्दतीने व या क्षेत्रात समान काम अंतिम यादी प्रसिध्दीकरणापर्यंत पुर्ण केल्याचा अनुभव असणाऱ्या अनुभवी संस्था/कंपनी व्दारे करणे योग्य होईल उपरोक्त काम हे तांत्रिक दृष्टया अत्यंत वैशीष्टपूर्ण व विशेष कौशल्य असणारे असुन त्यामध्ये मोठया प्रमाणात व कुशल कर्मचारी तसेच संगणकीकरण चा अंर्तभाव असुन सदरचे काम मनपा कर्मचारीव्दारे पुर्ण करणे शक्य वाटत नाही.

करीता उपरोक्त काम पुर्ण केलेल्या या क्षेत्रातील अनुभवी, कार्यक्षम व नोंदणीकृत कंपनी / एजन्सी कडुन निविदा प्रक्रीयेव्दारे अभिकर्ता नियुक्त करणेसाठी निविदा करणे योग्य राहील. करीता उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता मिळण्यासाठी समन्वय अधिकारी, प्रभाग समिती क्रं.०१ व ०४ यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ७ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप येणार नाही याची दक्षता घ्यावी.

**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.३७** **(महासभा)**

**विषय क्र.:- ०४** **प्रशासक ठराव क्र.:- २७४** **दिनांक :-३०/०४/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. उपअभियंता, पाणी पुरवठा विभाग यांचेकडिल पा.पु.विभाग/जा.क्र./२८/२०२५-२६ दि.२८/०४/२०२५
३. उपअभियंता, पाणी पुरवठा विभाग यांचा दि.१८/०३/२०२५ चा अभिप्राय
४. शहर अभियंता यांचा दि.१२/०२/२०२५ चा अभिप्राय
५. मुख्य लेखापरिक्षक यांचा दि.१९/०३/२०२५ चा अभिप्राय
६. आयुक्त यांचा दि.१९/०३/२०२५ चा अभिप्राय

**विषय :-** अमृत अभियान अंतर्गत जळगांव पाणी पुरवठा योजनेची यांत्रिकी कामे करणे कामी जादा कपात केलेली सुरक्षा अनामत रक्कम परत करणे बाबत.

---

वाचा क्र.१ व उपअभियंता, पाणी पुरवठा विभाग यांचा वाचा क्रं. २ ते ६ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

अमृत अभियान अंतर्गत जळगांव पाणी पुरवठा योजनेची यांत्रिकी कामे करणे कामाकरीता मे.भैरव इलेक्ट्रोमेक वर्क्स,जळगांव यांना इकडील पत्र क्रं./सा.बां./१९ दि.२१/०५/२०२० अन्वये कामाचा कार्यादेश देणेत आला. सदर मक्तेदार यांनी दि.२२/०८/२०२४ रोजीचा अर्जात नमुद केलेनुसार त्यांची जादाची कपात झालेली सुरक्षा अनामत परत करणेबाबत मागणी केलेली आहे.

सदर रक्कम ही अमृत पाणी पुरवठा योजने अंतर्गत ई निविदा सुचना क्रं.१३८१ अन्वये विदयुत, यांत्रिकी व स्काडा या कामाची निविदा मे.श्री.भैरव इलेक्ट्रोमेक वर्क्स,जळगांव यांना मिळाली असून विषयांकित कामाचा कार्यादेश देणेत आला आहे. सदरची मंजुर निविदा रक्कम रु.८,३२,३३,४२२/- मात्र असून या रक्कमेच्या ४ टक्के सुरक्षा अनामत निविदा शर्तीनुसार कपात करणे आवश्यक आहे. त्यापैकी २ टक्के सुरक्षा अनामत रु.१६.६५ लक्ष बँक हमी मक्तेदार यांनी दिली असून उर्वरीत २ टक्के रु.१६.६५ लक्ष बिलातून कपात करावयाची होती. परंतू मक्तेदार मे.भैरव इलेक्ट्रोमेक वर्क्स,जळगांव यांचे केलेल्या कामाचे धावते देयक क्रं.११ पावेतो त्यांचेकडून रु.२९,३३,९६५/- मात्र कपात झालेली असून निविदा शर्तीनुसार रु.१६.६५ लाख वजा जादा रक्कम रु.१२,६२,५०१/- मात्र जादा कपात झालेली आहे. उक्त नमुद रक्कम जमा आहे किंवा कसे याबाबत प्रमुख लेखापाल यांना विचारणा केलेनुसार रक्कम जमा असलेबाबत नमुद केले असून सदरची रक्कम परत करणेस हरकत नाही. मात्र सदर रक्कमेला ३ वर्ष पेक्षा जास्त कालावधी झाला असल्याने जादा कपात केलेली सुरक्षा अनामत रक्कम रु.१२,६२,५०१/- मात्र मक्तेदार मे.भैरव इलेक्ट्रोमेक वर्क्स,जळगांव यांना परत करणेकामी लेखासंहीतेच्या कलम २९९ नुसार मान्यता मिळण्यासाठी उपअभियंता, पाणी पुरवठा विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ६ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप येणार नाही याची दक्षता घ्यावी.

**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.३७** **(महासभा)**

**विषय क्र.:- ०५** **प्रशासक ठराव क्र.:- २७५** **दिनांक :-३०/०४/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांचेकडिल जा.क्र./बांधकाम/१०७/२०२५ दि.२९/०४/२०२५
३. शहर अभियंता यांचा दि.२९/०४/२०२५ चा अभिप्राय
४. मुख्य लेखापरिक्षक यांचा दि.२९/०४/२०२५ चा अभिप्राय
५. आयुक्त यांचा दि.३०/०४/२०२५ चा अभिप्राय

**विषय :-** महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोई सुविधांचा विकास योजने अंतर्गत विविध शासन निर्णयानुसार मनपास रक्कम रु.२२,८०,००,०००/- मात्रचे अनुदान प्राप्त झालेले आहे. सदरचे अनुदान हे शासन निर्णयानुसार ७५% रक्कम रु.१७,१०,००,०००/- खर्च करणे आवश्यक होते त्यामुळे त्यातील उर्वरीत २५% रक्कम रु.५,७०,००,०००/- मात्र अतिरिक्त प्राप्त झालेली आहे. सदर रक्कमे अंतर्गत मनपाचे विविध विकास कामे हाती घेण्यास व प्रस्तावीत केलेल्या ०१ ते ०३ कामांच्या रक्कम रु.५२,८८,४७८/- मात्रच्या अंदाजपत्रकास मान्यता होणे बाबत.

वाचा क्र.१ व शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांचा वाचा क्रं. २ ते ५ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

माजी नगरसेवीका श्रीमती रेखा चुडामण पाटील प्रभाग क्रं.१४ अ यांचे दि.१२/०२/२०२५ चे पत्र प्राप्त झालेले आहे. त्यात महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोई सुविधांचा विकास योजने अंतर्गत शासन प्राप्त शिल्लक निधी अंतर्गत खाली नमुद ०१ ते १७ कामे करुन मिळण्याबाबत सुचित केलेले आहे. त्यानुसार जळगांव शहर महानगरपालिके करीता सन २०२२-२३ व २०२३-२४ या कालावधीत मुलभुत सोई सुविधांचा विकास योजने अंतर्गत निधी मंजुर करण्यात आलेला आहे. सदरचा निधी हा ७५% शासन हिस्सा व २५% मनपा हिस्सा या प्रमाणात खर्च करण्यास मान्यता प्राप्त झालेल्या आहे.

महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोई सुविधांचा विकास योजने अंतर्गत एकुण रक्कम रु.२२,८०,००,०००/- कोटी निधी मंजुर करण्यात आलेला आहे. सदरचा निधी हा ७५% खर्च होणार असल्याने उर्वरीत २५% रक्कम ही मनपा खजिन्यात रक्कम रु. ५,७०,००,०००/- मात्र शिल्लक राहणार आहे. तसेच मंजुर कामांकरीता खर्च होवून कामांमध्ये प्रमाणे बचत झालेली व रद्द झालेल्या कामांची रक्कम रु.१,९१,४२,७६४/- मात्र शिल्लक आहे. त्यामुळे सन्मा. मा.नगरसेवीका श्रीमती रेखा चुडामण पाटील प्रभाग क्रं.१४ अ यांनी खाली नमुद प्रमाणे ०१ ते २१ कामे निधीच्या २५% शिल्लक रक्कमेतुन करण्याची मागणी केलेली आहे. त्यानुसार सदर कामांचे अंदाजपत्रकांना महासभा/प्रशासक ठराव क्रं.२६३ दि.१२/०३/२०२५ अन्वये मान्यता प्रदान केल्यानुसार सदर ०१ ते २१ कामांचा रक्कम रु. ७,०८,९८,३५५/- मात्रचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, जळगांव यांच्या कडेस दि.२७/०३/२०२५ रोजी सादर करण्यात आलेला आहे. परंतु अतिरीक्त प्राप्त अनुदान रक्कम रु. ५,७०,००,०००/- च्या अनुषंगाने रक्कम रु.७,६०,००,०००/- मात्रचा प्रस्ताव सादर करणे अपेक्षीत होते. परंतु रक्कम रु. ७,०८,९८,३५५/- मात्रचा प्रस्ताव पाठविण्यात आलेला होता त्यात (७,६०,००,००० – ७,०८,९८,३५५ ) = ५१,०१,६४५/- मात्र शिल्लक रहात असल्याने उर्वरीत रक्कमेचा म्हणजेच रक्कम रु. ५१.०१ लक्ष मात्रचा पुरवणी प्रस्ताव सादर करता येईल त्यानुसार खाली नमुद ०१ ते ०३ कामांचा रक्कम रु.५२.८८ लक्ष मात्रचा पुरवणी प्रस्ताव मुळ प्रस्तावात समावेश करणे बाबत शिवसेना जळगांव जिल्हा प्रमुख श्री विष्णू रामदास भंगाळे यांनी त्यांचे दि.२२/०४/२०२५ चे पत्रानुसार सुचित केलेले आहे. त्यानुसार खाली नमुद ०१ ते ०३ कामे वर नमुद प्रमाणे शासना कडुन महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोई सुविधांचा विकास योजने अंतर्गत रक्कम रु. ५,७०,००,०००/- मात्रच्या अतिरीक्त अनुदान म्हणुन महानगरपालिका जळगांव यांना प्राप्त झालेला आहे. सदरचे अनुदाना अंतर्गत खाली नमुद पुरवणी ०१ ते ०३ कामे करण्यास महासभा/प्रशासक यांची मान्यता होण्याकरीता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम | तांत्रिक मान्यतेची रक्कम |
|---|---|---|---|
| १. | प्रभाग क्रं.०५ मधील बळीराम पेठ येथील श्री अनिल वाणी यांच्या घरापासुन ओक मंगल कार्यालयापर्यंतचा रस्ता कॉक्रिटीकरण करणे | २०,००,०००/- | १९,३४,२०८/- |
| २. | प्रभाग क्रं.०५ मधील बळीराम पेठ येथील श्री वसंत एन भावसार यांच्या घरापासुन श्री प्रल्हाद सोनवणे यांच्या घरापर्यंतचा रस्ता कॉक्रिटीकरण करणे | २२,००,०००/- | २१,७२,०९८/- |
| ३. | प्रभाग क्रं.०५ मधील बळीराम पेठ येथील श्री आनंदा महाजन यांच्या घरापासुन श्री गोविंदा माळी यांच्या घरापर्यंतचा रस्ता कॉक्रिटीकरण करणे | १२,००,०००/- | ११,८२,१७२/- |
| | **एकुण रक्कम** | ५४,००,०००/- | ५२,८८,४७८/- |

वर नमुद ०१ ते ०३ कामांचे अंदाजपत्रके सन २०२२-२३ जिल्हादर सुचिनुसार संबंधित कं. अभियंता यांच्या मार्फत एकुण रक्कम रु. ५२,८८,४७८/- मात्रचे तयार करण्यात आलेले आहे. सदरचे ०१ ते ०३ कामे हे वर नमुद रक्कम रु ५,७०,००,०००/- शिल्लक निधी अंतर्गत प्रस्तावीत पुरवणी यादी नुसार करण्यास व सदरचे अंदाजपत्रकांना महासभा/प्रशासक यांची मान्यता घेवून प्रशासकीय व वित्तीय मान्यतेकरीता वरील ०१ ते ०३ कामांचा यापुर्वी सादर केलेल्या प्रस्तावा सोबत पुरवणी प्रस्ताव म्हणुन जिल्हाधिकारी, जळगांव यांचे कडेस पाठविण्यास मान्यता मिळण्यासाठी शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र. १ ते ५ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप येणार नाही तसेच सदर कामांबाबत व्दिरुक्ती होणार नाही याची दक्षता घ्यावी.

**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.३७** **(महासभा)**

**विषय क्र.:- ०६** **प्रशासक ठराव क्र.:- २७६** **दिनांक :-३०/०४/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांचेकडिल जा.क्र./बांधकाम/१०८/२०२५ दि.२९/०४/२०२५

३. शहर अभियंता यांचा अभिप्राय

४. सहाय्यक आयुक्त यांचा अभिप्राय

५. मुख्य लेखापरिक्षक यांचा दि.१७/०२/२०२५ चा अभिप्राय

६. आयुक्त यांचा अभिप्राय

**विषय :-** जळगांव शहर महानगरपालिका हद्‌दीतील पदमालय रेस्ट हाऊस येथे नविन वॉटर ए. टी. एम. रोटरी क्लब जळगांव (पुर्व) यांच्या मार्फत लावणेस मान्यता देणे बाबत.

---

वाचा क्र.१ व शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांचा वाचा क्रं. २ ते ६ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

रोटरी क्लब जळगांव (पुर्व) यांचा दि.२०/०१/२०२५ च्या पत्रानुसार जनसामान्याच्या सोईसाठी नवीन वॉटर ए.टी.एम. लावणेबाबत सुचित केल्याप्रामणे रोटरी क्लब जळगांव (पुर्व) यांनी जळगांव शहरातील पदमालय रेस्ट हाऊस येथे नवीन वॉटर ए टी एम बांधणेकामी मंजुरी अपेक्षिलेली आहे.

प्रस्तुत अर्जाच्या अनुषंगाने क्लबचे पदाधिकारी यांचे समेवत पाहणी केली असता पदमालय रेस्ट हाऊस शेजारी रोटरी क्लब यांनी यापुर्वी सुलभ शौचालयाचे बांधकाम केलेले असुन ते कार्यरत आहे. त्यालगत उत्तरेस ६.० ते ४.२० मी रुंदीची रस्त्याची जागा वॉटर ए टी एम करीता अपेक्षिलेली असुन त्याचा संपुर्ण खर्च संस्था करण्यास तयार आहे असे स्थळ पाहणी दरम्यान संस्थेच्या पदाधीकारी यांनी संगितलेले आहे.

तरी सदरचा उपक्रम हा जनहिताचा असल्याने तसेच अस्तित्वातील टॉयलेट ब्लॉक शेजारी जागा असल्याने प्रथम दर्शनी रहदारीस कुठल्याही अडथळा येणार नाही असे दिसुन येत असल्याने सदर उपक्रमासाठी खालील अटीवर मंजुरी देण्यास हरकत नाही

**अट :-** १. सदर जागेवर वॉटर ए टी एम बांधकाम करण्यापुर्वी शहर वाहतुक शाखेची नाहरकत घेणे आवश्यक राहील

२. सदरचा उपक्रम नागरीहिताचा असल्याने यातुन कुठल्याही प्रकारचा व्यावसायिक वापर करता येणार नाही अथवा उत्पन्न मिळवीता येणार नाही तसे आढळुन आल्यास सदरची परवानगी रद्द समजण्यात येईल व जागा रिक्त करुन घेण्यात येईल

३. सदर उपक्रम पुर्ण:ता जसे विज, पाणी, मशीनरी, मनुष्यबळ यंत्रणा संस्थेच्या खर्चाने करणे बंधनकारक राहील याकरिता भविष्यात मनपा कडुन कुठलाही खर्च मागणी करता येणार नाही अथवा कुठलाही खर्च देय्य होणार नाही

४. भविष्यात मनपास जागेची आवश्यकता भासल्यास जागा स्वखर्चाने मोकळी करुन दयावी लागेल त्यावेळी कुठल्याही कायदेशीर वाद निर्माण करता येणार नाही.

५.सदरचे ए टी एम करीता ची जागा पाच वर्षाच्या कालावधी करीता कराराने वापर तत्वावर अनुज्ञये करण्यात येत आहे त्या नंतर नियमा नुसार नुतनीकरण प्राप्त करुन घेणे बंधनकारक राहील.

६. मनपा चे वेळोवेळी होणारे आदेश बांधनकारक राहतील.

७.प्रस्तुत कामा करीता रु.५००/- मात्रचा स्टॅम्प पेपरवर अटी व शर्तीबाबत करारनामा करुन देणे बंधनकारक राहिल.

वर नमूद अटीनूसार जळगांव शहर महानगरपालिका हद्दीतील पदमालय रेस्ट हाऊस येथे नविन वॉटर ए. टी. एम. रोटरी क्लब जळगांव (पुर्व) यांच्या मार्फत लावणेस मान्यता मिळण्यासाठी शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ६ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप येणार नाही तसेच कायदेशीर अडचणी निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.

**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**